# प्रेसनोट

दि.१५/०९/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोतवाली पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | यासिन नासर अरब, वय–४२ वर्ष, विशेष वसुली व विक्री अधिकारी, अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेशन, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ३०,०००/– रुपये तडजोडी अंती २०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ७,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की,तक्रारदार यांनी २०१६ मध्ये भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, मर्या. केडगांव, अहमदनगर येथून ५,००,०००/– रुपये कर्ज घेतले होते. सदर कर्ज घेते वेळी तक्रारदार यांनी त्यांच्या आई व मामाच्या नावे असलेली त्यांची भोरवाडी, ता.नगर शिवारातील शेत गट नं.४९९ मधील १ हेक्टर ३० आर क्षेत्र जमीन तारण म्हणून दिली होती. तक्रारदार यांना पतसंस्थेकडून सदर कर्जफेड करण्यासाठी ५ वर्षाची मुदत देण्यात आलेली होती परंतु तक्रारदार मुदतीत कर्ज फेड करु शकले नाही त्यामुळे सदर वसुली बाबत भैरवनाथ पतसंस्थेने सहायक निबंधक सहकारी संस्था, अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेशन कडे पत्रव्यवहार केला होता. त्यानुसार सदर वसुली करण्यासाठी सहायक निबंधक सहकारी संस्था, अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेशन ने दि.२५/०५/२०२३ रोजी सुनावणी ठेवली होती. सदर सुनावणीस तक्रारदार यांना हजर राहणेबाबतची नोटीस प्राप्त होती. त्यानुसार तक्रारदार पण त्या ठिकाणी हजर होते, त्यादिवशी तक्रारदार यांनी फेडरेशनचे वसुली अधिकारी आरोपी लोकसेवक यासिन नासर अरब, वय–४२ वर्ष, विशेष वसुली व विक्री अधिकारी, अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेशन, अहमदनगर यांना कर्ज फेड करण्यासाठी २ महिन्याची मुदत मागितली असता आरोपी लोकसेवक अरब यांनी तक्रारदार यांना तोंडी दोन महिन्याची मुदत वाढ दिली होती. त्यानंतर कर्ज फेड मुदतवाढीसाठी फी म्हणून दि.२३/८/२०२३ रोजी १०००/– रुपये फी मागितली असता तक्रारदार यांनी त्यांच्या फोन पे ला १०००/– रुपये फोन पे केले त्याबाबत तक्रारदार यांना कोणतीही शासकीय पावती दिली नाही. त्यानंतर तक्रारदार यांनी दि.३१/८/२०२३ रोजी भैरवनाथ पतसंस्थेचे सर्व कर्ज फेड केले तसा पतसंस्थेने कर्ज निल दाखला तक्रारदार यांना दिला होता. त्यानंतर दि.४/९/२०२३ ते दि.७/९/२०२३ दरम्यान आरोपी लोकसेवक अरब यांनी तक्रारदार यांना वारंवार मोबाईल कॉल करुन मी तुला कर्ज फेड करण्यास मुदत दिली, तुझ्या जमिनीवर जप्ती येऊ दिली नाही, लिलाव होऊ दिला नाही, तुला मदत केल्याच्या मोबदल्यात तू मला ३०,०००/– रुपये दे, अशी लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार दि.०७/०९/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, अहमदनगर येथे तक्रारदार यांनी दिली होती.सदर तक्रारीच्या अनुषंगाने पंचासमक्ष दि.७/९/२०२३ व दि.८/९/२०२३ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली असता आरोपी लोकसेवक अरब यांनी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती २०,०००/– रुपये लाच मागणी करुन पहिला हप्ता म्हणून ७०००/– रुपये लाच रक्कम प्रथम स्वीकारण्याचे व पुढील दोन दिवसानंतर १३,०००/– रुपये लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले. त्यानुसार दि.८/९/२०२३ रोजी सापळा आयोजित करण्यात आला असता आरोपी लोकसेवक अरब यांनी तक्रारदार यांचेकडून नगद स्वरुपात लाच स्वीकारली नाही. त्यांनी सदर लाच रक्कम फोन पे वर सेंड करण्यास सांगितले होते. आज दि.१५/९/२०२३ रोजी आरोपी लोकसेवक अरब हे कार्यालयात हजर असतांना सदरची सापळा कारवाई आयोजित करुन तक्रारदार यांचे फोन पे वरुन ७०००/– रुपये लाच रक्कम आरोपी लोकसेवक अरब यांचे फोन पे वर सेंड करण्यात आली व आरोपी लोकसेवक अरब यांना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर बाबत कोतवाली पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– **acbmaharashtra.gov.in**

ई–मेल :– **acbwebmail@mahapolice.gov.in**

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– **acbmaharashtra.net**

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर